# भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८३ /२०२५ दि.२७/०८/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, भिवंडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक २७/०८/२०२५ ते दिनांक ०६/०९/२०२५ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. नमूद कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) कारीवली, हनुमान मंदिर जवळ विटभट्टी, सुतारआळी नाका या भागातुन मंडईकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **सुतारआळी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने सुतारआळी, इदगाहरोड अथवा दर्गाहरोड मार्गाने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) कॉटरगेट जकात नाका येथून मंडई, बाजारपेठ व तिनबत्ती कडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **हनुमानबावडी मिरॅकल मॉल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने कॉटरगेट मस्जिद येथून जैतुनपुरा भिवंडी शहर पो.स्टे. मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) धामणकर नाक्याकडून जुना ठाणा रोडने मंडईकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **केशरबाग नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने केशरबाग नाका येथून उजवीकडे वळून कुंभारआळी मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) **(अ)** मुंबई ठाणे कडून जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम व हलकी वाहने त्यात कार, रिक्षा, दुचाकी वाहनांना **अंजुर फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **(अ)** सदर जड वाहने वसई रोड मार्गाने कारवली जकात नाका व विटभट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) **(ब)** टी.एम.टी./एस.टी.बसेस व हलक्या वाहनांना **नारपोली पो.स्टे.** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **(ब)** टी.एम.टी./एस.टी.चे प्रवासी नारपोली पो.स्टे. या ठिकाणी उतरतील व तेथूनच प्रवासी घेवून परत जातील आणि हलकी वाहने देवजीनगर अथवा साईनाथ सोसायटी कामतघर रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ५) **(अ)** रांजनोली नाका कडून भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड, मध्यम व हलकी वाहने त्यात कार, रिक्षा, दुचाकी वाहने यांना **रांजणोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | ५) **(अ)** सदर जड, मध्यम व हलकी वाहने रांजणोली नाका येथून वळसा घेवून मुंबई–नाशिक बायपास हायवे वरून माणकोली नाका येथून अंजूर फाटा वसई रोडने किंवा ओवळी खिंड येथून ओवळी गांव, ताडाळी जकात नाका, कामतघर किंवा पाईपलाईन रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ५) **(ब)** एस.टी./के.डी.एम.टी./टी.एम.टी बसेसना **रांजणोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **(ब)** एस.टी./के.डी.एम.टी./टी.एम.टी बसेस रांजणोली नाका येथे प्रवासी उतरवतील व तेथूनच प्रवासी भरून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ६) **(अ)** वाडा रोड मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड, अवजड वाहनांना **अंबाडीनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **(अ)** सदरची जड, अवजड वाहने अंबाडीनाका येथून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ ने अथवा बृहन्मुंबई महानगर पालीका पाईपलाईन मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ६) **(ब)** वाडा रोडने नदीनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **पारोळ फाटा (नदीनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **(ब)** हलकी वाहने पारोळफाटा येथून उजवीकडे वळून खोणीगाव, तळवली फाटा, कांबा रोड या पर्यायी मार्गाने वसई रोड येथून डावीकडे वळून कारीवली मार्गे इच्छित स्थळी जातील अथवा विश्वभारती फाटा येथून डावीकडे वळून गोरसई गाव मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ७) मुंबई ठाणे बाजूकडून जुना आग्रा रोडने गोल्डनडाईज येथून कशेळी मार्गे नाशिककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अंजुर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने जुना आग्रा रोडने न जाता माणकोली मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ हायवे बायपास मार्गे नाशिककडे जातील. |

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **८)** वडपा चेकपोस्ट मार्गे भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना एस.टी. बसेससह **धामणगांव जांबोळी पाईपलाईन नाका व चाविंद्रा नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **(अ)** सदर वाहने धामणगांव पाईपलाईन येथे उजवीकडे वळण घेवुन पाईपलाईन मार्गे वाडयाकडे व पुढे इच्छित स्थळी जातील. |
| | **(ब)** तसेच एस.टी. बसेस प्रवासी चाविंद्रा जकातनाका या ठिकाणी उतरवतील व तेथूनच प्रवासी घेवून बस वळवून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद – व नो पार्किंग** | **दिनांक ०२/०९/२०२५ (गौरी व गणपती व सात दिवसाचे), दि. ०६/०९/२०२५** रोजी **(अनंत चतुर्थी)** या दिवशी राजनोली नाका, भादवड नाका, के.बी.चौकी पाईपलाईन ते कल्याण नाका व अंजुर फाटा ते नदीनाका, टावरे कंम्पाऊंड, दुधबावडी नाका, दर्गारोड, केशरबाग नाका, मंडई, तिनबत्ती, बाजारपेठ, झेंडानाका, टिळकचौक, शिवाजी पथ, हाफीजीबाबा दर्गाह, वंजारपट्टीनाका, नदीनाका पर्यंत आणि धामणकर नाका ते वऱ्हाळदेवी तलाव, भादवड नाका, कल्याण नाका व नारपोली पोलिस स्टेशन ते नदी नाका या मिरवणुकीच्या मार्गावर रस्त्याचे दोन्ही बाजूस कोणतीही वाहने उभी करण्यास **सक्त मनाई करण्यात येत आहे.**<br>तसेच सर्व प्रकारची वाहने (गणपती मूर्ती घेवून जाणारे वाहनांखेरीज) टांगे, हातगाडया यांनासुध्दा सदर मार्गावर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दि. २८/०८/२०२५ रोजी (दीड दिवसाचे), दि.३१/०८/२०२५ रोजी (पाच दिवसाचे), दि.०२/०९/२०२५ (गौरी गणपती व सात दिवसाचे ) व दि. ०६/०९/२०२५ रोजी (अनंत चतुर्थी)** या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेतील वाहने व गणपती मूर्ती विसर्जनातील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिक, भिवंडी
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, कल्याण व नवी मुंबई
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग, ठाणे/भिवंडी/कल्याण
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२ भिवंडी व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.भिवंडी निजामपूरा शहरा च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.